# मुंबई विद्यापीठ
# दूर व मुक्त अध्ययन संस्था
## पदवी प्रमाणपत्र वितरणाच्या संबंधीची सूचना

दूर व मुक्त अध्ययन संस्थेमधील जे विद्यार्थी मार्च २०१४ च्या तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम./बी.एससी (आयटी)/बी.एससी (कॉम्प्युटर सायन्स)/बी.एस.सी. (नॉटीकल टेक्नॉलॉजी), एम.ए., एम.ए. (शिक्षणशास्त्र), एम. कॉम.,एम.एस.सी. (आय.टी.), एम.एस.सी. (कॉम्प्युटर सायन्स) व एम.सी.ए. (पीजीडीएफएम व पीजीडीओआरएम व्यतिरिक्त) या अभ्यासक्रमाच्या पदवी प्रमाणपत्र संस्थेस विद्यापीठाकडून प्राप्त झालेली आहेत.

दि. २ फेब्रुवारी २०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता यातील प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या **काही निवडक** विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र संस्थेने आयोजित केलेल्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात देण्यात येणार आहेत.

या व्यतिरिक्त प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग, तृतीय वर्ग उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी मार्च २०१४ ची पदवी प्रमाणपत्रे दि. ३ फेब्रुवारी, २०१५ पासून दुपारी २.३० ते सायंकाळी ५.०० वाजता सोमवार ते शुक्रवार (दुसरा व चौथा शनिवार व सार्वजनिक सुट्टया सोडून) आपले ओळखपत्र व गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत सादर करून संस्थेतून घेऊन जावीत. हि प्रमाणपत्रे दोन महिन्याच्या आत घेऊन जावीत.

जे विद्यार्थी स्वत: येऊ शकत नसतील अशा विद्यार्थ्यांनी पालकांसोबत स्वत:चे अधिकार पत्र, ओळखपत्र, गुणपत्रिका व पालकांचे ओळखपत्र घेऊन प्रमाणपत्र घेण्यास पाठवावे.

२००९—२०१३ यावर्षी उत्तीर्ण झालेले जे विद्यार्थी त्यांची पदवी प्रमाणपत्रे आतापर्यंत संस्थेकडून घेऊन गेलेले नाहीत; त्या विद्यार्थ्यांनी त्यांची प्रमाणपत्रे संस्थेतून पहिला, तिसरा व पाचव्या शनिवारी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत संस्थेतून घेऊन जावीत.

दि. : ३१ जानेवारी, २०१५

**डॉ. डी. हरिचंदन**
**प्राध्यापक व संचालक**